साप्ताहिक

# दिनमान

तत्वांचा सन्मान... मातीशी ईमान

संपादक : समीर मुजावर | RNI NO. MAHMAR/2007/22212 | कार्यकारी संपादक : सौ. नाजनीन मुजावर

वर्ष १० वे : अंक ५ वा  सोमवार १६ ऑक्टोबर २०१७  पृष्ठे ८  : मूल्य ५ रूपये  email : dinmaan@gmail.com  (वार्षिक वर्गणी : रू १००/ – सर्व विशेष अंकासह)

# दिवाळी सण माणुसकीच्या रंगाने उजळू दे



दुरितांचे तिमिर जावो । विश्व स्वधर्म सूर्ये पाहो । जो जे वांच्छिल तो तें लाहो । प्राणिजात संत ज्ञानेश्वरदया, क्षमा, शांती तेथे देवाची वस्ती या तत्वांना घेऊन यंदाची दिवाळी आपण मोठ्या आनंदाने साजरी करुया.

संत ज्ञानेश्वर महाराजांनी पसायदानातून मांडलेले हे विचार जगाला मानवतेची शिकवण देतात. दिवाळी हा सण उत्साहाचा, आनंदाचा आणि नवे विचार नवी दिशा दाखवणारा सण, अंधारातून प्रकाशाकडे नेणारा आणि जीवन उजळवून टाकणारा दीपोत्सवाचा सण, वाईट प्रवृत्तीचा नाश करुन चांगल्या गोष्टींचा स्वीकार करायला लावणारा सण. नवा जोश, नवा उत्साह घेऊन येणारा सण, मानवतेचा संदेश आणि शिकवण देणारा सण, मैत्री वाढवणारा आणि वैरभावना नष्ट करणारा सण, हर्षोल्हीत करणारा, सुखवणारा, नात्याची वीण घट्ट करणारा सण, दिवाळी नव्या सप्तरंगाची उधळण, दिवाळी म्हणजे नवे कपडे, नव्या वस्तुंचं भांडारच, दिवाळी म्हणजे आवडत्या वस्तुंची खरेदी आणि सोनेरी स्वप्नाची बरसात.

दया, क्षमा, शांती तेथे देवाची वस्ती या तत्वांना घेऊन ही दिवाळी मोठ्या आनंदाने साजरी करुया. अलीकडच्या काळामध्ये दिवाळी हा सण मोठ्या उत्साहामध्ये साजरा करण्यात येतो. आजच्या बदललेल्या तंत्रज्ञानाच्या युगामध्ये नवनवीन वस्तुंची खरेदी करणे, वेगवेगळ्या ठिकाणी कुटुंबासमवेत फिरायला जाणे, मौज मजा करणे, मित्रांसोबत पार्टी करणे, भरमसाठ महागाचे फटाके फोडणे इतकाच मर्यादित अर्थ आजच्या तरुणाईला माहीत आहे. हे तरुणाईच्या वेगळ्या प्रकारच्या उत्साहावरुन आणि वर्तनावरुन जाणवते. बदलती जीवनशैली, वाढते औद्योगिकीकरण, कारखानदारी, भांडवलशाही, दळणवळणाच्या साधनांची वाढ, चैनविलासी जीवनप्रवृत्ती, चंगळवाद यामुळे आजची तरुणाई दिशाहीन होताना दिसत आहे. तंत्रज्ञानांचा वाढता अमर्यादित वापर आणि संगणकाने घेतलेल्या मानवाच्या मेंदूवरील ताबा यामुळे स्वतः विचार करण्याची शक्तीच क्षीण होत चालली आहे. अशा या बाहेर पडता न येणाऱ्या व जाळ्यात आम्ही सापडलेलो आहोत, पण आपल्या या समाजामध्ये असाही एक वर्ग चाचपडत आहे. दुर्लक्षिलेला आणि वंचित आहे. आम्हाला या वर्गाशी काही देणे घेणेच नाही. आम्ही फक्त पुस्तकातील प्रतिज्ञेपुरतं मर्यादित ठेवलं आहे त्यांना.

आजच्या काळात सहवास आणि संवाद हरवत चालला आहे. आजच्या धकाधकीच्या जीवनामध्ये माणसाला स्वतःसाठी आणि आपल्या परिवारासाठी देखील वेळ नाही. नात्यांची वीण मजबूत होण्याऐवजी ती दुभंगत चालली आहे. ऐहिक सुख आणि समाधानासाठी माणूस फक्त धावत आणि चाचपडत आहे. यंत्र तयार करणारा माणूस स्वतः यंत्र होऊन बसलेला आहे.

जगण्याचे संदर्भ बदलत चालले आहेत. मोठ्या प्रमाणावर चंगळवाद वाढलेला आहे. नैतिक मूल्यांचा ऱ्हास होताना दिसत आहे. या सगळ्या अधःपतनाने आपल्याला दीप होऊन तेवत राहायचे आहे. आजही सामाजिक भान आणि जाण असलेला समाज आणि तरुण मने आहेत. हे ही आम्हाला विसरून चालणार नाही. आपल्या देशाच्या विविध भागामध्ये सामाजिक संस्था, तरुण मंडळे, सेवाभावी संस्था, सामाजिक ऋण या जाणिवेतून काम करताना दिसत आहेत. ही गोष्ट खूपच स्वागतार्ह आहे.

आज आपल्या देशाच्या विविध भागामध्ये वृद्धाश्रम, अनाथ, निराधार आश्रम, महिला बालगृहे, निरिक्षण गृहे, शिशुगृहे, बालकल्याण आश्रम, डेस्टीटयुट चिल्ड्रेन होम, गरीब विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे, अंध – अपंग कल्याणकारी संस्था, महिला कल्याण आश्रम, निराधार महिला प्रसुतिगृहे आहेत या सर्व संस्थांना सेवाभावी वृत्तीने मदतीसाठी हात पुढे आले पाहिजेत आणि दिवाळीचा आनंद स्वतःबरोबर आपल्या बांधवांचा आनंदही द्विगुणीत केला पाहिजे.

पर्यावरणाचा विचार करुन कोणताही सण साजरा करणे गरजेचे आहे. याचे कारण हेच आहे कि, आपण सर्वजण निसर्गावर अवलंबून आहोत. निसर्ग जर संतुलित ठेवला तरच आपले आरोग्य संतुलित राहणार आहे, याचे भान आपल्या सर्वांना असले पाहिजे. शहरीकरण झपाट्याने वाढत आहे आणि त्यामुळे यंत्रासारखे माणसाला काम करावे लागत आहे, याचा आरोग्यावर मोठ्या प्रमाणावर परिणाम होत आहे. त्यामुळे सार्वजनिक आरोग्य अबाधित आणि निरोगी राखण्यासाठी सण सभारंभाच्या, उत्सवाच्या उत्साहामध्ये रंगाचा बेरंग होऊ नये याची प्रत्येकाने काळजी घेतली पाहिजे.

सामाजिक बांधिलकी या नात्याने समाजातील शांतता अबाधित राखण्यासाठी प्रत्येकाने प्रयत्न करणे गरजेचे आहे. फुल नाही फुलाची पाकळी या नात्याने रंजल्या गांजल्यांसाठी आणि त्यांचे अश्रू पुसण्यासाठी (पान ४ वर)

JEET Communication

जीत कम्युनिकेशन फायनान्स धमाका!

पैसे नाहीत...नो टेंन्शन

जीत आहे ना...!

आता घेऊन या पॅनकार्ड, आधारकार्ड आणि चेक व घेऊन जावा तुमच्या स्वप्नातील स्मार्टफोन तेही पैसे न भरता...



0% व्याजदराने,

भरा फक्त ₹1* व घेऊन जा,

तुमच्या स्वप्नातील स्मार्टफोन !

फक्त आणि फक्त जीत मध्ये.

चक्क ट्रिपल झिरो ऑफर 0%*

☑ डाऊन पेमेंट...

☑ व्याजदर...

☑ प्रोसेसिंग फी...

1396/97, Near Samsung Center and Parmale Cycle, Tikke Building, Laxmipuri, Kolhapur. Phone No. : 8668333122

साप्ताहिक
# दिनमान
तत्वांचा सन्मान... मातीशी ईमान

आई-वडीलांची सेवा हीच खरी ईश्वर सेवा!

## रंग दिवाळीचे..

तरुणाई आणि दिवाळी हे दोन्ही शब्द एकमेकांसाठी पूरक आहेत. दिवाळीमध्ये तरुणाई नसेल तर त्याचा आनंद मिळवणं जरा कठीणच. सर्व सणांमध्ये या बदललेल्या सणांच्या स्वरूपामध्येही आनंदाने सहभागी होणाऱ्या या तरुणाईवर नेहमीच टीका होते. ही मुलं आपल्या परंपरा जपत नाहीत किंवा आमच्यावेळी असं नव्हतं हं अशी वाक्यं ऐकायला मिळतात. पण खरंच या सणांमध्ये एवढा बदल झालाय? आणि जर तसं असेल तर ते आपल्या प्रगत होत जाणार्यास संस्कृतीसाठी योग्य की अयोग्य?

पूर्वीच्या काळी दिवाळीची मजा खरंच न्यारी होती. अख्खा वाडा म्हणजे एक कुटुंब असं समजून साजरी होणारी दिवाळीही वेगळी.. फराळाचा खमंग वास.. किल्ल्यासाठी माती, दगड गोळा करणे, त्यावरून भांडणं होणे, किल्ल्यावर शेवटचा हात फिरवण्यासाठी चाललेली मुलांची धावपळ, मुलींची रांगोळीची तयारी आणि फटाके खरेदी..हे सगळं आज घडणं शक्य आहे. आजच्या फ्लॅट संस्कृतीमध्ये या सगळ्या गोष्टी घडणं शक्य नाही आणि त्यामुळे कदाचित आजच्या पिढीत सणांच्या संकल्पना थोडया फार बदलत चालल्या आहेत. दिवाळीची पहाट, दिव्यांच्या प्रकाशात उजळलेल्या बागा आणि फराळ या गोष्टींनी स्वत:ची जागा दिवाळी या सणात निर्माण केली आहे. पूर्वी होणाऱ्या सणांच्या तुलनेत आता अनेक बदल झाले आहेत हे नक्की. आताच्या पिढीच्या मानसिकतेतही बदल झाले आहेत. परंपरेची जागा थोडया फार प्रमाणात एन्जॉयमेंटनी घेतली आहे. अनिर्बंध फटाके उडवण्यासारख्या गोष्टीही हमखास दिसतात. किती हजारांचे फटाके उडवले किंवा किती हजारांची माळ लावली असं अभिमानाने सांगणारी आपली पोरं ही चौका-चौकात सापडतात. पण सणाच्या रंगाचा बेरंग करण्याचा हेतू त्यात नक्कीच नसतो.

अभ्यासाच्या आणि करिअरच्या शर्यतीत अनेकजणांना आपल्या खास मित्र-मैत्रिणींना भेटणंही अवघड जातं. दिवाळीच्या निमित्ताने असे सवंगडी पुन्हा एकदा पारावर जमतात आणि त्या पारावरच दिवाळीची ती संध्याकाळ साजरी करतात. हॉस्टेलवर राहणारे मित्र आपल्या इतर मित्रांना घेऊन गावी जातात आणि गावाकडची वेगळी दिवाळी अनुभवतात. दिवाळी पहाटच्या निमित्ताने तो आणि ती एकमेकांना भेटतात आणि पुन्हा रोज भेटलं पाहिजे असा मनाशी विचार करतात. प्रदूषण करणारे आवाजाचे फटाके न उडवता निसर्गाची हानी रोखण्याचा वैयक्तिक प्रयत्न अनेक तरुण- तरुणी करतात. एरव्ही जिन्स आणि टी-शर्टमध्ये असणारे तरुण-तरुणी नऊवारी साडया आणि सलवार कुर्त्यामध्ये दिसून येतात. असे दिवाळीचे रंग या तरुणाईशिवाय अनुभवणे कठीणच.

## दिवाळीसंदर्भात असलेल्या गमतीदार माहितीने पुराणात तसेच इतिहासात आपले स्थान निर्माण केले आहे.

**म्हणूनच हा सण एखाद्या विशिष्ट समूहाचा न राहता संपूर्ण राष्ट्राचा बनला आहे. दिवाळीविषयी काही रंगतदार व गमतीदार माहिति खालीलप्रमाणे**

१. प्रभू राम रावणाचा पराभव केल्यानंतर अयोध्येला परतत असताना त्यांच्या वाटेवर लोकांनी दिवे लावून स्वागत केल्याचे त्रेतायुगात सांगितले आहे.

२. श्रीकृष्णाने अत्याचारी नरकासुराचा वध केल्यानंतर गोकुळवासियांनी आपला आनंद दिवे लावून व्यक्त केल्याची कथा प्रचलित आहे.

३. देवीने महाकालीचे रूप धारण करून राक्षसांचा वध केला होता. त्याचा वध केल्यानंतरही महाकालीचा क्रोध कमी झाला नव्हता, तेव्हा भगवान शंकराने स्वत: देवीच्या चरणी लोटांगण घातले. शंकराच्या शरीर स्पर्शाने महाकालीचा क्रोध शांत झाला. त्याची आठवण म्हणून लक्ष्मीची पूजा केली जाते. या दिवशी तिच्या रौद्ररूपाची पूजा करण्याची प्रथा आहे.

४. बळीराजाने आपल्या पराक्रमाच्या जोरावर त्रैलोक्यावर विजय मिळविला होता. या विजयाने भयभीत झालेल्या देवांनी भगवान विष्णूची प्रार्थना केली. त्यांची प्रार्थना ऐकून विष्णूने वामन रूप धारण करून बळी राजाला तीन पायांत दान मागितले. विष्णूने तीन पायाने त्रैलोक्य घेतले. बळीच्या दानशूरपणामुळे प्रसन्न झालेल्या विष्णूने त्याला पाताळाचे राज्य देवून भू-लोकवासी त्याच्या आठवणीनिमित्त प्रत्येक वर्षी दिवाळी साजरी करतील असे आश्वासन दिले.

५. शिखांचे सहावे गुरू हरगोविंदसिंग बादशाह जहांगीरच्या कैदेतुन सुटून कार्तिक अमावस्येच्या दिवशी अमृतसरला आले.

६. दिवाळीच्या एक दिवस अगोदर म्हणजे चतुर्थीला श्रीकृष्णाने नरकासुराचा वध केला होता. यामुळे आनंदी झालेल्या गोकुळवासियांनी दुसऱ्या दिवशी अमावस्येला दिवे लावून आनंद साजरा केला होता.

७. इसवी सन पूर्व ५०० वर्षापूर्वी मोहेंजोदडो येथे सापडलेल्या अवशेषांमध्ये एका मातीच्या मूर्तीनुसार त्याकाळी दिवाळी साजरी केली जात असल्याचे समजते. मूर्तीच्या दोन्ही बाजूला दिवे जळताना दिसून येत होते.

८. इसवी सन पूर्व २५०० वर्षापूर्वी गौतम बुद्धांच्या अनुयायांनी त्यांच्या स्वागतासाठी लाखो दिवे लावून दिवाळी साजरी केली होती.

९. सम्राट विक्रमादित्याचा राज्याभिषेक दिवाळीच्या दिवशी झाला होता. त्याच दिवशी दिवे लावून जनतेने आनंद साजरा केला होता.

१०. इसवी सन पूर्व चौथ्या शतकातील कौटिल्य अर्थशास्त्रानुसार कार्तिक अमावस्येच्या दिवशी मंदिरात आणि घाटावर मोठ्या प्रमाणात दिवे लावले जात असल्याचे सांगितले आहे.

११. अमृतसर येथील सुवर्णमंदिराचे बांधकाम दिवाळीच्या दिवशी सुरु झाले.

१२. जैन धर्माचे चोविसावे तीर्थंकर भगवान महावीर यांनी दिवाळीच्या दिवशीच बिहारमधील पावापुरी येथे आपल्या शरीराचा त्याग केला होता. 'महावीर सवंत्स' त्यांच्या दुसऱ्याच दिवशी सुरू होते. त्यामुळे अनेक प्रांतातील लोक याला नवीन वर्षाची सुरवात मानतात. प्राचीन जैन ग्रंथात दीपोत्सवाचे वर्णन आहे. महावीर निर्वाणामुळे जी अंर्तज्योती कायमची विझून गेली होती, तिची कमतरता पूर्ण करण्यासाठी आपण बर्हिज्योतीचे प्रतीक म्हणून दिवे लावू या असे कल्पसूत्रात सांगितले आहे.

१३. पंजाबमध्ये जन्मलेल्या स्वामी रामतीर्थ आणि महाप्रयाण या दोघांचा जन्म दिवाळीच्या दिवशी झाला होता. त्यांनी दिवाळीच्या दिवशी गंगाकिनारी स्नान करताना 'ओम' म्हणून समाधी घेतली होती.

१४. महर्षी दयानंदांनी दिवाळीच्या दिवशी अजमेरजवळ समाधी घेतली होती. त्यांनी आर्य समाजाची स्थापना केली होती.

१५. मोगल सम्राट अकबराच्या काळात दौलतखान्यासमोर ४० गज उंच बांबूवर एक मोठा आकाशकंदील लटकविला जात असे. यावेळी बादशहा देखील दिवाळी मोठ्या आनंदाने साजरी करत असे.

१६. मोगल वंशाचे शेवटचे सम्राट बहादुरशहा जफर दिवाळी सणाच्या रूपात साजरी करत असत आणि यावेळी आयोजित केलेल्या कार्यक्रमात सहभागी होत असत.

१७. शहा आलम दुसरा याच्या काळात संपूर्ण शाही महाल दिव्यांनी सजविला जात असे आणि लाल किल्ल्यावर आयोजित केलेल्या कार्यक्रमात हिंदू-मुसलमान सहभागी होत असत.

★★★

## दिवाळीचा आनंद द्विगुणित करण्यासाठी..



दिवाळीचा सण जवळ येऊ लागताच लोकांमधील उत्साह, आनंद आणि उल्हास वाढत जातो. सणाचे हे दिवस अगदी मौजमजेत घालवायला सर्वानाच आवडतात. या दिवसांचा आनंद द्विगुणित करण्यासाठी काही वैशिष्ट्यपूर्ण गोष्टी करण्याकडे बऱ्याच जणांचा कल असतो. कुटुंबासोबत घालवलेले आनंदाचे हे क्षण सर्वानाच अविस्मरणीय ठरावेत, असेच वाटत असते.

स्त्रियांच्या उत्साहाला तर पारावारच राहत नाही. घर, अंगण लखलखीत ठेवण्यापासून ते त्याची शोभा वाढविण्यापर्यंत सर्वत्र त्यांचा उत्साह ओसंडून वाहत असतो. जितकी काळजी घराच्या सजावटीची तितकीच स्वत: सुंदर दिसण्याची. दररोज बदलत जाणाऱ्या आधुनिक फॅशन तंत्रानुसार सजण्या-सवरण्याच्या पद्धतीतही बरेच बदल झाले आहेत.

साधेपणातील सौंदर्य लोकांना विशेष आकर्षित करते. जास्तीत जास्त सौंदर्यप्रसाधने वापरून भपकेबाज मेकअप करण्याची रीत आता मागे पडली आहे. त्याऐवजी थोडक्या प्रसाधनांचा वापर करत साधेपणाने राहण्यात जास्त समाधान मिळते. हीच विचारसरणी सणावाराच्या दिवशीही प्रत्ययास येते. म्हणूनच दिवाळीची खरेदी करताना स्त्रिया नैसर्गिक साधनांपासून बनवलेल्या वस्तूंनाच जास्त प्राधान्य देतात. स्त्रियांसोबतच लहान मुलांसाठी देखील कपडयांचे वेगवेगळे प्रकार बाजारात पहावयास मिळतात. दिवाळीनिमित्त खास कपडे आणि दागिने बनवून घेणे सर्वानाच आवडते.

दिवाळीचा सण खऱ्या अर्थाने साजरा केला जातो तो रात्रीच्या वेळी. अशावेळी गडद रंगांचे कपडे जास्त उठून दिसतात. यासोबत मोठमोठे इअररिंग्ज आणि मॅचिंग ज्वेलरी वापरल्यास तुमच्या सौंदर्यात आणखी भर पडेल. सुंदर आणि आकर्षक कपडयांसोबतच डोळे देखील मेकअप करून सजवा. अशा वेळी आपला पेहराव देखील खास हवा.

सणासाठी तरुणी नेहमी साडी वापरण्याला प्राधान्य देतात. कारण या पेहरावामुळे त्या मोहक आणि भारदार दिसतात. कित्येक तरुणी पारंपरिक चुडीदार आणि फॅशनेबल कुर्ता घालणे पसंत करतात. तुम्ही देखील अशा प्रकारे नटूनथटून दिवाळी साजरी केलीत तर या सणाचा झगमगाट आणि आनंद आणखीन वाढेल. दिवाळीच्या या आनंदाला तुमच्या उठावदार सौंदर्याची साथ लाभल्यास एका अपूर्व आनंदाची अनुभूती मिळेल. ज्यातून सुख आणि समृद्धी बहरत राहील. ★★★

## दिवाळीची धुम...

आकाश कंदिल लाघले दारांत  
उजळल्या ज्योती दीप अंगणांत  
सडा सन्मार्जने सजल्या अंगणी  
आली आली आली सणांची ही राणी

दिवाळीच्या सणातला लहान मुला मुलींचा आनंदाचा भाग म्हणजे आकाशकंदिल तयार करणे, किल्ला करणे, त्यावर चित्रे मांडणे, संध्याकाळी दारापुढे छान छान रांगोळ्या काढणे आणि फटाके वाजविणे इ. दिपावली हा सण सर्वत्र आनंद व उत्साहाने साजरा होतो.

दिवाळीचे दुसरं नांव दीपावली. हा उत्सव म्हणजे दीपोत्सव. दिव्यांचा उत्सव दिव्यांच्या असंख्य ओळी घराअंगणात लावल्या जातात. म्हणून तिचं नाव दीपावली.

ह्या सणाची सुरवात वसुबारसेपासून होते आणि भाऊबीज साजरी केल्यानंतर दिवाळीची सांगता होते. सर्व अबाल वृद्ध, मुले, स्त्रीया ह्यांचा हा लाडका सण. दिवाळी येणार म्हटलं की आवराआवर रंगरंगोटी. नव्या कपड्यांची, दागिन्यांची, घरातील वस्तूंची खरेदीची ही पर्वणी. फटाक्यांची आतिषबाजी अन चविष्ट दिवाळी फराळाचा स्वाद हे ह्या सणाच आणखी एक वैशिष्ट्य.

आपला भारत देश हा कृषीप्रधान देश. आपली थोर संस्कृती सुद्ध सर्वावर प्रेम करायला शिकवणारी. म्हणूनच की काय वसुबारस ह्या दिवशी आपण गाय आणि वासरू ह्यांची पूजा करतो. त्यांना गोडाचा घास खाऊ घालतो. दुध-दुभत्यासाठी होणारा गायीचा उपयोग शेतीच्या कामी बैलाची होणारी मदत ह्या गोष्टी लक्षांत घेऊन त्या गोधनाची केलेली ही कृतज्ञता पूजा.

धनत्रयोदशीला तिन्ही सांजेला केली जाणारी धनाची पूजा, नैवेद्याला ठेवला जाणारा धने-गुळाचा प्रसाद ह्याला ही फार मोठे महत्त्व आहे. ह्याच दिवशी एक दिवा तयार करून तो यमदेवतेसाठी लावला जातो. दक्षिण दिशा ही यमाची दिशा म्हणून या दिवशी त्या दिव्याची ज्योत ही दक्षिणेला केली जाते.

नरक चतुर्दशी हा मुख्य दिवाळीचा पहिला दिवस. ह्या दिवशी पहाटे उठून अभ्यंग स्नान करायचे. नवीन वस्त्रे परिधान करायची. देवदर्शन घ्यायचे आणि सर्वांनी एकत्र जमून दिवाळी फराळ करायचा असा हा आनंद साजरा करण्याचा दिवस. ह्या दिवसाची एक पौराणिक कथा जोडली आहे ती अशी की श्रीकृष्णानी अत्याचारी नरकासुराचा वध करून त्याच्या बंदी शाळेतल्या सोळा सहस्त्र कन्यांची मुक्तता केली. तो हा दिवस, दुष्टाचा नाशा आणि मुक्ताचा आनंद हे या दिवसामागचे आनंद साजरा करण्याचे कारण आहे.

अश्विनातले शेवटचे दोन दिवस आणि कार्तिकाचे पहिले दोन दिवस अशी ही चार दिवसांची मुख्य दिवाळी. अश्विन वद्अतिमावस्येला संध्याकाळी घरोघरी, दुकानांतून सोन्या-चांदीच्या पेढ्यातून, ऑफिसातून (पान ३ वर)

# दिवाळीची धुम...

(पान २ वरुन) लक्ष्मीपूजन केले जाते. घरातल सोन नाणं-रोकड ह्यांची पूजा करतात. व्यापारी सर्व हिशेबाच्या वह्यांचे पूजन करतो. ह्या धनलक्ष्मीच्या पूजनाबरोबरच त्या दिवशी आरोग्य लक्ष्मी (केरसुणी) हिची पण पूजा करतात. लक्ष्मी पूजनानंतर फटाक्यांची अतिषबाजी करून आनंद साजरा केला जातो.

पाडवा म्हणजे बलिप्रतिपदा साडेतीन मुहुर्तातला एक मुहुर्त. ह्या दिवशी अनेक नवे प्रकल्प चालू केले जातात. पाडव्याच्या दिवशी पत्नी पतीला ओवाळते. पती पत्नीला पाडव्याची भेट म्हणून वस्तू, दागिना किंवा साडी भेट देतो.

कार्तिक शुद्ध द्वितीयेलाच यमद्वितीया किंवा भाऊबीज असे म्हणतात. बहिण भावाच्या उत्कट प्रेमाचा हा दिवस, बहिण भावाला स्नान घालते, गोड भोजन देते, ओवाळते आणि भाऊ बहिणीला ओवाळणी घालतो. दिवाळीच्या सणातला लहान मुला मुलींचा आनंदाचा भाग म्हणजे आकाशकंदिल तयार करणे, किल्ला करणे, त्यावर चित्रे मांडणे, संध्याकाळी दारापुढे छान छान रांगोळ्या काढणे आणि फटाके वाजविणे इ. दिपावली हा सण सर्वत्र आनंद व उत्साहाने साजरा होतो. परस्परांना भेट वस्तू, शुभेच्छापत्रे इ. देवून आनंद दिला घेतला जातो. अज्ञानाचा नाश आणि ज्ञानाचा प्रकाश देणारी ही दिवाळी सर्वांनाच प्रिय आहे.

जो तो आपापल्या परीने ती साजरी करतो आणि आनंद लुटतो. दिवाळी म्हणजे अत्यंत आनंदी. सुखद दिपावलीच्या अनेक सुखद आठवणींपुढे अनेक दिवस मनांत रेंगाळत राहतात. ★★★

# दीपावलीचे फटाके आणि मानवी आरोग्यावर होणारे परिणाम



फटाक्यामध्ये अनेक विषारी पदार्थ असतात. ज्वलन सहाय्यक, ज्वलनशील आणि ज्वालाग्रही घटक फटाक्यात असतात. उदा. तांबे, कॅडमियम, शिसे, गंधक, मॅंगनीज, मॅग्नेशिअम, फॉस्फरस, नायट्राईट, जस्त इत्यादी. यात कॅडमियम २ मिलिग्रॅम (१०० मिली ग्रॅम), शिसे ४८२ मिली ग्रॅम इतके असते.

फटाक्यामुळे श्वसनाचे विकार, दमा, ह्दयविकार, फुफुसाचे विकार यासारखे आजार होतात. मानवी आरोग्यावर फार मोठे परिणाम फटाके करतात. याकडे कोणीही लक्ष देत नाही. दिवसेंदिवस ही समस्या अधिकाधिक तीव्र होत आहे. फटाक्यात असणारे घटक व त्याचे मानवी आरोग्यावर होणारे परिणाम पुढीलप्रमाणे आहेत.

शिसे : हे फटाक्यात अत्यंत घातक घटक आहे. याच्यापासून जो धूर हवेत मिसळतो त्याचे श्वसन झाले तर फुफ्फुसाचा कर्करोग होतो. लहान मुले मतिमंद होतात. याचा परिणाम मज्जारज्जूवरही होत असल्याचे पुढे आले आहे.

मॅग्नेशिअम : या रसायनाचा परिणाम मानवी त्वचेवर होतो. याच्या मुळे त्वचा विकार बळावतो.

जस्त : जस्ताचाही परिणाम त्वचेवर होतो व परिणामी त्वचारोग जडतो. याचा परिणाम फुफ्फुसावरही होतो.

नायट्रेट : याचाही परिणाम मानवी आरोग्यावर होतो. याच्या सानिध्याने उलटया, जुलाब होतात. अतिसारही संभवतो.

नायट्राईट : या रसायनाने उलटया होतात.

तांबे : तांब्यामुळे त्वचेवर परिणाम होऊन त्वचारोग होतो. याचा परिणाम मेंदूसारख्या नाजूक व महत्वाच्या रोगावर होतो.

कॅडमियम : या महत्वाच्या पदार्थाचा परिणाम मुत्रपिंडावर होतो.

मॅंगेनीज : याच्यामुळे मानवाला निद्रानाशाला सामोरे जावे लागते. निद्रानाशामुळे इतरही गंभीर आजार संभवतात.

फॉस्फारस : याचा परिणाम डोळ्यांसारख्या नाजूक भागावर होतो. या रसायनाचा परिणाम मज्जातंतूवरही होतो.

गंधक : गंधकाचा परिणाम त्वचेवर होतो. त्यामुळे त्वचाविकार होतात.

उपरोक्त रसायने व त्याचे मानवी आरोग्यावर होणारे परिणाम याचा गंभीरपणे विचार केल्यास दिवाळीत उडविले जाणारे फटाके मानवी आरोग्यावर किती परिणाम करतात हे स्पष्टपणे जाणवते. फटाक्याचा आवाज तीव्र असल्याने तो आवाज सातत्याने ऐकल्यास कर्णबधिरता येण्याची शक्यता नाकारता येत नाही. लहान मुले, गर्भवती महिला, ज्येष्ठ नागरीक यांना याचा त्रास अधिक होतो. या सर्वाचा एकंदर पर्यावरणावर परिणाम होत आहे. बहुतेक सर्व घरात फटाक्यासाठी पैसे खर्च केले जातात. या पैशाची बचतही होईल.

दिवाळीत होणारे पर्यावरणाचे प्रदूषण टाळणे काळाची गरज आहे. या काळात वायू व ध्वनी प्रदूषण होते. वायू प्रदूषण व ध्वनी प्रदूषण टाळून आपल्याला पर्यावरणाचे रक्षण करता येईल... ★★★















# दिवाळी सण माणुसकीच्या रंगाने उजळू दे

(पान १ वरुन) आपण सदैव पुढे आले पाहिजे आणि प्रत्येक चांगल्या लोकोपयोगी कार्यासाठी आपला हातभार लागला पाहिजे. ही सामाजिक कृतज्ञतेची भावना प्रत्येकामध्ये रुजणे आजच्या काळामध्ये अत्यंत गरजेचे आहे. सामाजिक, राजकीय वातावरण दूषित होत असताना प्रत्येकाने या देशाचा नागरिक या नात्याने या विषमतेच्या, जातीय आणि धर्मांधतेच्या वातावरणामध्ये दीप होऊन तेवत राहिले पाहिजे.

समाज आणि देशाचा विकास, उन्नती आजच्या नवयुवकांच्या हातामध्ये आहे याचं भान आणि जाण नक्कीच आजच्या युवकांमध्ये आहे. आजचा युवक नक्कीच संवेदनशील आहे, देणाऱ्याने देत जावे, घेणाऱ्याने घेत जावे, घेता घेता एक दिवस देणाऱ्याचे हात घ्यावे या विंदांच्या काव्यपंक्तीप्रमाणे आपल्याबरोबर वंचितांचे, दिन - दुबळ्यांचे आयुष्य आणि भविष्य उज्वल करण्याचे आणि आपल्या वंचित बांधवांना मुख्य प्रवाहात आणण्याचे काम आपण साऱ्या देशबांधवांनी, नवयुवकांनी करायचे आहे. आज या मंगलमय दिवाळीच्या सणानिमित्त आपण सर्वांनी हीच प्रतिज्ञा आणि प्रार्थना करायची आहे की, सर्वांचं आयुष्य सुखी समाधानाचे, समृद्धीचे आणि भरभराटीचे होऊ दे, सर्व प्राणिमात्रांना चांगली बुद्धी लाभू दे, सर्वांचे कल्याण होऊ दे आणि सर्वांच्या सुखाच्या आनंदाचा हिस्सा होण्याचे भाग्य आम्हाला लाभू दे हीच आपल्याला ईश्वर चरणी प्रार्थना करायची आहे.

स्वतःपुरते जगणारे कधीच खरे आयुष्य जगू शकत नाहीत ज्याला दुसर्यांच्या दुःखाचा कळवळा आहे, दुसर्यांच्या डोळ्यातील अश्रू पाहून ज्याचा उर भरुन येतो, ज्याला एकमेकांप्रती आपुलकी आणि सद्भावना आहे, मग तो मुका प्राणी का असेना; अश्या या आत्मीयता, आपुलकी, आपलेपण, बांधिलकी, समता, बंधुता असलेला समाज आणि व्यक्तीच बदल घडवू शकते आणि अशा प्रकारचा समाज आणि व्यक्ती आपल्या समाजामध्ये आहे म्हणूनच हा समाज, हा देश तरलेला आहे. हीच आशा आणि अपेक्षा यापुढील काळातील तरुणाईकडूनही आहे.

चला तर मग आपल्या आनंदाबरोबर सर्वांचा आनंद द्विगुणीत करुया, अनेक संकटे येतील त्या संकटांना तोंड देण्याचं सामर्थ्य आणि धाडस नक्कीच प्रत्येकामध्ये येवो आणि दुःखाच्या, संकटाच्या खाईतून सर्वांना तारून पुढे घेऊन जावो हीच सद्भावना आणि प्रार्थना. दुसऱ्याच्या चेहऱ्यावरील दुःख तर आपण अनेकदा पाहत असतो पण इतरांच्या चेहऱ्यावरील आनंद पाहण्याचे भाग्य क्वचितच काही जणांना लाभत असते, समोरच्या व्यक्तीच्या आनंदाचे कारण जर आपण असेल तर जगातील कोणत्याही आनंदापेक्षा हा आनंद सर्वात मोठा असतो. तर चला मग आज दिवाळीच्या क्षणाला इतरांच्या आनंदाचे कारण बनूया.

हरवले आभाळ ज्यांचे हो तयांचा सोबती सापडेना वाट ज्यांना हो तयांचा सारथी... ★★★

साप्ताहिक
दिनमान
- वाढदिवस विशेषांक.
- बँक, पतसंस्था अहवाल व ताळेबंद.
- रंगीत व कृष्णधवल, आकर्षक मांडणी व सुबक छपाईसह अतीशय माफक दरात करून देऊ.

संपर्क : यु.जी.एफ. ऑफीस नं ६, एम्पायर टॉवर, दसरा चौक, कोल्हापूर. मोबा. ९८२३२०७८६०/ ९४०३१०७८६०

सर्वांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा.



सौ. संध्या शेखर घोटणे
मा. नगरसेविका को.म.न.पा.
महिला शहर अध्यक्षा कोल्हापूर राष्ट्रीय कॉंग्रेस



शेखर सदाशिव घोटणे
मा. नगरसेवक को.म.न.पा.

## बेसन लाडू

बेसन लाडू - दिवाळीच्या फराळातील एक गोड पदार्थ म्हणजे बेसन लाडू साच्यातून काढल्यास त्याच्या आकारामुळे नाविन्य निर्माण होते.

साहित्य : ३ वाट्या हरबऱ्याच्या डाळीचे रवाळ पीठ, दीड वाटी डालडा तूप, पाव वाटी दूध, ३ वाट्या पिठीसाखर, ७-८ वेलदोड्यांची पूड, अर्धा जायफळ पूड, २५ ग्रॅम बेदाणा, १० ग्रॅम काजूचे काप

कृती : तुपावर डाळीचे पीठ खमंग भाजून घ्या. छान वास आला की त्यावर दूध शिंपडून बाजूला ठेवा. मिश्रण कोमट झाले की त्यात पिठीसाखर, वेलदोडे, जायफळ, बेदाणा, काजू घालून मिश्रण कालवा. नंतर त्याचे बेताच्या आकाराचे लाडू वळा. मोदकाच्या साच्याला पातळ तुपाचा हात फिरवावा व प्रत्येक लाडू साच्यातून काढावा. आकाराच्या नाविन्यामुळे छान दिसतात.

सर्वांना
दिपावलीच्या
हार्दिक शुभेच्छा !
भाजपा-ताराराणी
आघाडी मित्र पक्ष



मा. विजय सुर्यवंशी
नगरसेवक को.म.न.पा.
(गटनेता भाजप)

सर्वांना दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा...
समर्थ उद्योग समुह
गोकुळ
गोकूळ दूधाचे कसबा बावड्यातील वितरक



श्री. सागर उलपे
समर्थ दूध एजन्सी | समर्थ इंजिनिअरींग वर्क्स
कसबा बावडा, कोल्हापूर. मो. ९२७३२३०१२३

MOHITE SUZUKI
SUZUKI Way of Life!
WISHING YOU
A HAPPY DIWALI
GREAT GOLD RUSH OFFER



Access 125
64 KM/L SEP
*Under Suzuki test Conditions
SUZUKI GIXXER SF
शानदार बाइक्स सोबत
मिळतात शानदार बक्षिसे.
ह्या सणासुदीमध्ये कोणत्याही सुझुकी टू व्हीलरच्या खरेदीवर मिळवा हमखास बक्षीस!
सोन्याची नाणी, घड्याळे, सनग्लासेस आणि जिंकण्यासाठी इतर आकर्षक बक्षिसे. त्वरा करा!
paytm mall SCAN & BOOK
₹ 5000 पर्यंत कॅशबॅक*
₹ 1500 पर्यंत विमा मोफत*
कमी ईएमआय आणि
कमी डाउन पेमेंट स्कीम
एक्सचेंज बोनस
BENETTON MEN'S WATCH | PROVOGUE SUNGLASSES | 24 KARAT 5GM GOLD | 24 KARAT 1GM GOLD | BENETTON PEN | BENETTON WOMEN'S WATCH
Old P.B. Road, Opp. Sayaji Hotel, Kolhapur. Ph. 0231-2530061/62/63 | Workshop : 0231-2535363, Mob. 8805969595 | Spares : 7350016129 | Service : 7350015130

AL-FIZA NIDHI LTD
Reg. No. :U65999PN2017PLC171513

# अल-फिजा निधी लिमिटेड. अल-फिजा ग्रुप ऑफ कंपनीज्, कोल्हापूर.

AL-FIZA GROUP OF COMPANIES KOLHAPUR, MAH.

## ऐतिहासिक कोल्हापूर शहरा मध्ये संपूर्ण वातानुकूलीत भव्य असे अल-फिजा ग्रुप ऑफ कंपनीज्‌चे प्रधान कार्यालय




### संचालक मंडळ

श्री. हसनअली ए.वणू (चेअरमन)

सौ. वहिदा आर. मुल्ला (व्हा.चेअरमन)
श्री. अजिम एच.सोलकर (संचालक)
श्री. रमिज भाटकर (संचालक)
श्री. निसार शेख (संचालक)
श्री. तौफिक ए. मुल्ला (संचालक)
कु. सना मुल्ला (संचालिका)

### व्यवस्थापकिय मंडळ

श्री. अरिफ इनामदार (ग्रुप एम.डी.)
श्री. मुदस्सिर मोडक (ग्रुप सी.ई.ओ.)
श्री. राजेंद्र कदम (ग्रुप ए.आर.एम.)
डॉ. सलिम अलतेकर (निधी.सी.जी.एम.)
श्री. अल्लाबक्ष तांबोळी (निधी जी.एम.कोल्हापूर)
श्री. अनिस मंचेकर (निधी जी.एम.रत्नागिरी)
श्री. ईम्तीयाज वस्ता (निधी जी.एम.रत्नागिरी)
श्री.अविनाष पराडकर (निधी जी.एम.सिंधुदुर्ग)
सौ. नसिमा चिलवान (ग्रुप मार्केटींग हेड)
श्री. नजीर आडूळकर (निधी डि.ओ.)
श्री. नसिमा वस्ता (निधी डि.ओ.)
श्री. दाऊद मोमीन (निधी.डि.ओ.)
श्री. मुजीर मोमीन (निधी.डि.ओ.)
श्री.जितेंद्र तुर्किया (ग्रुप कॉन्ट्रक्टर)

### PROJECTS






तथास्तू कॉर्नर २ रा. मजला डि,/६/७/८/९/ रेल्वे गेट समोर पाच बंगला चौक ई वॉर्ड शाहुपूरी कोल्हापूर.

*Email: alfizanidhiltdklp@gmail.com ,*
*Website: www.alfizanidhiltd.com*

*Email: alfizagroupklp@gmail.com ,*
*Website:www.alfizagroup.org*


संपर्क: ०२३१-२५३४३३३/२५३७३३३

सौ.वहिदा आर.मुल्ला
(ग्रुप व्हा. प्रेसिडंट)



श्री.हसनअली अबूबक्कर वणू
(ग्रुप प्रेसिडंट)

तमाम माझ्या हिंदू बांधवांना दिपावलीच्या मन:पूर्वक हार्दिक शुभेच्छा.!



# नरक चतुर्दशी

नरकचतुर्दशीच्या दिवशी पहाटे उठून सूर्योदयापूर्वी अभ्यंगस्नान केले जाते.

नरक चतुर्दशी हा नरक चतुर्दशीच्या दिवसांतील एक आहे. दर वर्षातील आश्विन कृष्ण चतुर्दशीस नरक चतुर्दशी येते. आश्विन कृष्ण चतुर्दशीस नरक चतुर्दशी हा सण साजरा केला जातो. नरकचतुर्दशीच्या दिवशी पहाटे संपूर्ण शरीरास तेलाचे मर्दन करून आपल्यातील नरकरूपी पापवासनांचा नायनाट व अहंकाराचे उच्चाटन करायचे आहे. तेव्हाच आत्म्यावरील अहंचा पडदा दूर होऊन आत्मज्योत प्रकाशित होईल. नरकचतुर्दशीच्या दिवशी पहाटे उठून सूर्योदयापूर्वी अभ्यंगस्नान केले जाते.

**आख्यायिका**

नरक चतुर्दशी या सणाशी संबंधित नरकासुर वधाची आख्यायिका प्रचलित आहे. या दिवशी कृष्णाने नरकासुराचा वध करून प्रजेला त्याच्या जुलमी राजवटीतून सोडवले. नरकासुराने तप करून ब्रह्मदेवाला प्रसन्न करून घेतले व अध्यत्वाचा म्हणजेच कुणाकडूनही वध होणार नाही असा वर मागून घेतला. त्या वराच्या योगाने त्याने अनेक राजांना हरवून त्यांच्या कन्या व त्या राज्यांतील स्त्रियांचे अपहरण केले. नरकासुराने अशा एकूण १६,१०० स्त्रियांना पळवून नेले व मणिपर्वतावर एक नगर वसवून त्यात त्यांना बंदी बनवून ठेवले. त्याने अगणित संपत्ती लुटली व अशाच हावेपोटी त्याने देवमाता अदितीची कुंडले व वरुणाचे विशाल छत्रही बळकावले. त्याला मिळालेल्या वरामुळे तो देव, गंधर्व व मानवांना तापदायक झाला होता.

अनेक गिरिदुर्गांनी वेढलेले प्राग्ज्योतिषपूर हे नगर त्याची राजधानी होती. ही राजधानी अनेक वेगवेगळ्या प्रकारच्या खंदकांनी अग्नी, पाणी इत्यादींनी वेढलेली होती. या दुर्जय राजधानीवर कृष्णाने गरुडावर स्वार होऊन चाल केली.

कृष्णाने नरकासुराच्या देहाचे दोन तुकडे करत त्याचा वध केला. नरकासुर वधाने देवादिकांना, तसेच प्रजेला आनंद झाला. नरकासुराच्या बंदिवासातील कुमारिकांना त्यांचे स्वजन स्वीकारणार नाहीत, हे जाणून कृष्णाने या १६,१०० कन्यांसोबत विवाह केला व त्यांना सामाजिक प्रतिष्ठा मिळवून दिली. कृष्णाच्या पराक्रमाचे स्मरण म्हणून नरक चतुर्दशी साजरी करतात.

***

दिपावलीच्या
हार्दिक शुभेच्छा !

श्री. सुनिल कदम
मा. महापौर को.म.न.पा.
नगरसेवक ताराराणी आघाडी

दिपावलीच्या
हार्दिक शुभेच्छा !

श्री. ईश्वर परमार
नगरसेवक को.म.न.पा.

सर्वांना
दिपावलीच्या
हार्दिक शुभेच्छा !

साजिद गुलाबखान खान
सुप्रिटेंडंट, मुस्लिम बोर्डिंग कोल्हापूर

दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा...
डॉ.सौ. उज्ज्वला पत्की (एम.डी.)
डॉ. सतीश पत्की (एम.डी.)
पत्की हॉस्पिटल
पदव्यूत्तर प्रशिक्षण व संशोधन केंद्र
▸ स्त्रीरोग
▸ प्रसूति
▸ वंध्यत्व चिकित्सा
▸ शस्त्रक्रिया
▸ अल्ट्रासाऊंड स्कॅन
▸ लॅपरोस्कोपी
६९३, ई वॉर्ड, शाहुपूरी ३ री गल्ली, कोल्हापूर.
Tel : 0231 - 2651666, 2651635.

Happy and Prosperous Diwali...
Mandar S. Hasabnis
Mob : 9823276346
SUSMITA
Healthcare
We Deals in Cardiac Surgers
Instruments & Machines
Office : Shop No. 6, 1st Floor, Empire Tower, Dasara Chowk, Kolhapur. Ph : 2646356
Resi : Amar Vikas Sahakari Grihanirman Sanstha, Plot No. 43, New Vashi Naka, Kolhapur. Ph. (0231) 2323526, Mob : 9823276346

Live दिनमान.com
तत्वांचा सन्मान... मातीशी ईमान
www.livedinmaan.com

▸ कोल्हापूरचं आपलं डायनॅमिक डिजिटल न्यूज पोर्टल.
▸ प्रत्येक क्षणाची खबरबात तात्काळ आपल्यापर्यंत पोहचणार.
▸ 256 सदस्यांचा समावेश असलेल्या तब्बल 5000 Whatsup ग्रुपवर केवळ एका मिनिटात बातमी होणार प्रकाशित.
▸ 30 हजार सदस्यांच्या ब्रॉडकास्टींग Whatsup वर सुद्धा त्याच क्षणाला बातमी केली जाणार शेअर.
▸ सत्य कधीच लपवता येणार नाही. निर्भिड, बेडर वार्ताहरांची टीम करणार भ्रष्टाचाराचा पोल-खोल.
▸ सर्व सामान्यांच्या प्रश्नावर आम्हीच फोडणार वाचा...
▸ www.livedinmaan.com या लींकवर क्लीक करा आणि कुठेही, कोणत्याही क्षणी बित्तमबातमीचा करा पाठलाग.
▸ आता आपल्या व्यवसायाची, उत्पादनाची जाहीरात करणेही अतिशय सोपे. ''दिनमान डॉट कॉम''च्या वेबसाईटवर खास जाहिरातीसाठी पॉप-अप आणि प्राईम लोकेशन उपलब्ध तेही अगदी माफक दरात...
▸ कॉम्प्युटर, लॅपटॉप, मोबाईल, आयपॅड, टॅबलेट सारख्या कोणत्याही गॅझेटवर तुम्ही वाचू शकणार आता दररोजच्या घडामोडींचे अपडेटस्.
▸ मग चला तर लॉगइन करु www.livedinmaan.com कोल्हापूरकरांचं आपलं डायनॅमिक डिजिटल न्यूज पोर्टल...
आम्ही येतोय लवकरच...

# धनत्रयोदशी



आश्विन कृष्ण त्रयोदशीस धनत्रयोदशी हा सण साजरा केला जातो. धनत्रयोदशी या सणामागे एक मनोवेधक कथा आहे.

आयुर्वेदाच्या दृष्टीने धनत्रयोदशी हा दिवस धन्वंतरी जयंतीचा आहे. वैद्य मंडळी या दिवशी धन्वंतरीचे (देवांचा वैद्य) पूजन करतात. प्रसादास कडुनिंबाच्या पानांचे बारीक केलेले तुकडे व साखर असे लोकांना देतात. यात मोठा अर्थ आहे.

कथित भविष्यवाणी प्रमाणे हेमा राजाचा पुत्र आपल्या सोळाव्या वर्षी मृत्युमुखी पडणार असतो. आपला पुत्राने जीवनाची सर्व सुखे उपभोगावीत म्हणून राजा व राणी त्याचे लग्न करतात. लग्नानंतर चौथा दिवस हा तो मृत्युमुखी पडण्याचा दिवस असतो. या रात्री त्याची पत्नी त्यास झोपू देत नाही. त्याच्या अवतीभवती सोन्या-चांदीच्या मोहरा ठेवल्या जातात. महालाचे प्रवेशद्वार ही असेच सोन्या चांदीने भरून रोखले जाते. सर्व महालात मोठमोठ्या दिव्यांनी लखलखीत प्रकाश केला जातो. वेगवेगळी गाणी व गोष्टी सांगून पत्नी त्याला जागे ठेवते. जेव्हा यम राजकुमाराच्या खोलीत सर्परुपात प्रवेश करण्याचा प्रयत्न करतो तेंव्हा त्याचे डोळे सोन्या चांदीने दिपतात. या कारणास्तव यम आपल्या जगात (यमलोकात) परततो. अशा प्रकारे राजकुमाराचे प्राण वाचतो. म्हणूनच या दिवसास यमदीपदान असेही म्हणतात. या दिवशी सायंकाळी घराबाहेर दिवा लावून त्याच्या वातीचे टोक दक्षिण दिशेस करतात. त्यानंतर त्या दिव्यास नमस्कार करतात. याने अपमृत्यु टळतो असा समज आहे.

धनत्रयोदशी बद्दल अजून एक दंतकथा आहे. ती म्हणजे समुद्र मंथन. जेव्हा असुरांबरोबर इंद्रदेव यांनी महर्षि दुर्वास यांच्या शाप निवाराणास समुद्र मंथन केले, तेव्हा त्यातुन देवी लक्ष्मी प्रगट झाली.तसेच समुद्र मंथनातून धन्वंतरी अमृतकुंभ बाहेर घेऊन आला. म्हणून धन्वंतरीचीही या दिवशी पुजा केली जाते. या दिवसास धन्वंतरी जयंती असेही म्हणतात.

आयुर्वेदाच्या दृष्टीने हा दिवस धन्वंतरी जयंतीचा आहे. वैद्य मंडळी या दिवशी धन्वंतरीचे (देवांचा वैद्य) पूजन करतात. प्रसादास कडुनिंबाच्या पानांचे बारीक केलेले तुकडे व साखर असे लोकांना देतात. यात मोठा अर्थ आहे. कडुनिंबाची उत्पत्ति अमृतापासून झाली आहे. धन्वंतरी हा अमृतत्व देणारा आहे, हे त्यातून प्रतीत होते. कडुनिंबाची पाच-सहा पाने जर रोज खाल्ली तर व्याधि होण्याचा संभव नाही. एवढे कडुनिंबाचे महत्त्व आहे. म्हणून या दिवशी तोच धन्वंतरीचा प्रसाद म्हणून देण्यात येतो.

# चकली

चकली दिवाळीच्या फराळातील महत्वाचा खमंग व खुसखुशीत पदार्थ जो सर्वांना आवडतो व तोंडाला चव आणतो तो म्हणजे चकली.

**जिन्नस**

१ कप तांदळाचे पीठ, अर्धा कप बेसन, २ चमचे लोणी, १ चमचा तेल, १ चमचा तिखट, मीठ, तळणासाठी तेल, पाककृती

सर्व सामग्री मिसळा. पाणी कालवून गरम कणके सारखे मळा.

चकलीच्या साच्यात मिश्रण भरून गोल आकारात पिळून गरम तेलात तळा.

हवा बंद डब्यात बरेच दिवस साठवून ठेवता येते.

# लक्ष्मी पूजन



आश्विन अमावास्येस लक्ष्मीपूजन हा सण साजरा केला जातो.

या दिवशी स्वच्छता करण्यासाठी लागणारी नवी केरसुणी विकत घेतात. तिलाच लक्ष्मी मानून तिच्यावर पाणी घालून हळद-कुंकू वाहून घरात वापरण्यास सुरुवात करतात.

लक्ष्मीपूजनाच्या दिवशी श्रीविष्णूने लक्ष्मीसह सर्व देवांना बळीच्या कारागृहातून मुक्त केले अशी कथा आहे. प्रातःकाळी मंगलस्नान करून देवपूजा, दुपारी पार्वणश्राद्ध अन्‍ ब्राह्मणभोजन आणि प्रदोषकाळी (संध्याकाळी) लता-पल्लवींनी सुशोभित केलेल्या मंडपात लक्ष्मी, श्रीविष्णु इत्यादी देवता आणि कुबेर यांची पूजा, असा लक्ष्मीपूजन या दिवसाचा विधी आहे.

श्री लक्ष्मीपूजनाच्या वेळी अक्षतांनी बनवलेले अष्टदल कमल किंवा स्वस्तिक यांवरच श्री लक्ष्मीची स्थापना केली जाते. त्यानंतर लक्ष्म्यादी देवतांना लवंग, वेलची आणि साखर घालून तयार केलेल्या गायीच्या दुधाच्या खव्याचा नैवेद्य दाखवतात. धने, गूळ, साळीच्या लाह्या, बत्तासे इत्यादी पदार्थ लक्ष्मीला वाहून नंतर ते आप्तेष्टांना वाटतात.

आश्विन अमावास्येच्या रात्री लक्ष्मी सर्वत्र संचार करते आणि आपल्या निवासासाठी योग्य असे स्थान शोधू लागते. जेथे चारित्र्यवान, कर्तव्यदक्ष, संयमी, धर्मनिष्ठ, देवभक्त आणि क्षमाशील पुरुष आणि गुणवती आणि पतीव्रता स्त्रिया असतात, त्या घरी वास्तव्य करणे लक्ष्मीला आवडते.

लक्ष्मीपूजनाच्या दिवशी रात्री केर का काढतात ?

आश्विन अमावास्येला सूक्ष्म स्वरूपात गतीमान होणारी त्रासदायक स्पंदने जागृत होतात आणि पुन्हा पूर्ण वायूमंडलात गतीमान होण्यास सुरुवात होते. केर काढल्यामुळे घरात शिरलेले त्रासदायक घटक आणि वायूमंडलात गतीमान असणारी त्रासदायक स्पंदने घराच्या बाहेर फेकले जातात. त्यामुळे घराचे पावित्र्यही टिकून रहाते. म्हणून आश्विन अमावास्येच्या रात्री अलक्ष्मी निःसारण, म्हणजेच रात्री १२ वाजता घरात केर काढतात.

या दिवशी प्रदोषकाळी (संध्याकाळी) लक्ष्मीचे पूजन केले जाते. लक्ष्मी ही फार चंचल असते असा समज आहे. त्यामुळे, शक्यतो हिंदू शास्त्राप्रमाणे लक्ष्मीपूजन हे स्थिर लग्नावर करतात. त्याने लक्ष्मी स्थिर राहते असा समज आहे. अनेक घरांत श्रीसूक्तपठणही केले जाते. या दिवशी बळी पाताळात गाडला गेला, सर्व देवतांची सुटका झाली व लक्ष्मीचे वर्चस्व अबाधित झाले याची आठवण म्हणून यादिवशी लक्ष्मीपूजन करतात. व्यापारी लोकांचे हिशोबाचे नवीन वर्ष लक्ष्मीपूजनानंतर सुरू होते. या दिवशी सर्व अभ्यंग स्नान करतात. पाटावर रांगोळी काढून तांदुळ ठेवतात. त्यावर वाटी किंवा तबक ठेवतात. त्यात सोन्याचे दागिने, चांदीचा रुपया, दागिने ठेवून त्यांची पूजा करतात. हा दिवस व्यापारी लोक फार उत्साहात साजरा करतात.

या दिवशी स्वच्छता करण्यासाठी लागणारी नवी केरसुणी विकत घेतात. तिलाच लक्ष्मी मानून तिच्यावर पाणी घालून हळद-कुंकू वाहून घरात वापरण्यास सुरुवात करतात. कृष्णाने नरकासुराचा वध केला तेव्हापासून नरक चतुर्दशी साजरी करतात. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी अलक्ष्मीचा नाश व्हावा, यासाठी धार्मिक कृती करतात. बलिप्रतिपदा बळी राजाचा नाश झाल्याचे प्रतीक आहे. तर भाऊबीज ही शकटासुर या असुराचा नाश करून असंख्य भगिनींना त्यांचा बंधु कृष्ण याने सोडवल्याचा आनंद म्हणून साजरी करतात. अशा तऱ्हेने दीपावलीचा प्रत्येक दिवस हा असुरांचा संहार केल्याच्या, धर्माने अधर्मावर विजय मिळवल्याच्या दिवसाची आठवण म्हणून मंगलमय दीपांनी उजळवायचा, असं आपली संस्कृती सांगते.



# बलिप्रतिपदा

कार्तिक शुद्ध प्रतिपदेस बलिप्रतिपदा हा सण साजरा केला जातो.

बळीराजाची दानशूरता पाहून वामनाने त्याला पाताळाचे राज्य दिले आणि दात्याची सेवा करण्यास वामनाने बळीराज्याचे द्वारपाल होण्याचे काम स्वीकारले. तो दिवस म्हणजे कार्तिक शुद्ध प्रतिपदा होय. या दिवशी विक्रम संवत सुरु होते. पाडवा हा साडेतीन मुहूर्तांपैकी हा एक मुहूर्त आहे.

आर्थिक हिशोबाच्या दृष्टीने व्यापारी लोक बलिप्रतिपदातील पाडवा ही नववर्षाची सुरुवात मानतात. लक्ष्मीप्राप्तीसाठी नव्या वह्यांचे पूजन करून व्यापारी लोक वर्षाचा प्रारंभ करतात. व्यापारी लोकांच्या जमा-खर्चाच्या कीर्द खतावणीच्या नवीन वह्या ह्या दिवशी सुरु होतात. कीर्द खतावणीच्या नवीन वह्या सुरू करण्यापूर्वी वह्यांना हळद-कुंकू, गंध, फूल, अक्षता वाहून पूजा करतात. घरोघरी सायंकाळी पाटाभोवती रांगोळी काढून पत्नी पतीला औक्षण करते व पती पत्नीला वाळणी घालतो. नवविवाहीत दांपत्याची पहिली बलिप्रतिपदा पत्नीच्या माहेरी साजरी करतात. ह्यालाच दिवाळसण म्हणतात. त्यानिमित्त यादिवशी जावयांस आहेर करतात.

# भाऊ बीज




कार्तिक शुद्ध द्वितीयेस भाऊबीज हा सण साजरा केला जातो.

बंधू-भगिनींचा प्रेमसंवर्धनाचा भाऊबीज हा सण कार्तिक शुद्ध द्वितीयेस साजरा केला जातो.

हा दिवस म्हणजे शरद ऋतूतील कार्तिक मासातील द्वितीया. द्वितीयेचा चंद्र आकर्षक व वर्धमानता दाखवणारा आहे. तेव्हा बीजेच्या कोरीप्रमाणे बंधुप्रेमाचे वर्धन होत राहो, ही त्यामागची भूमिका आहे. आपल्या मनातील द्वेष व असूया निघाल्यामुळे सर्वत्र बंधुभावनेची कल्पना जागृत होते; म्हणून त्याकरिता भाऊबीजेच्या सण.

बंधू-भगिनींचा प्रेम संवर्धनाचा हा दिवस आहे. ज्या समाजात भगिनींना समाजातील व राष्ट्रातील पुरुष वर्ग भगिनी समजून त्यांच्या संरक्षणाची जबाबदारी घेऊन त्यांना अभय देतील व त्यामुळे त्या समाजात निर्भयतेने फिरू शकतील, तो दिवस, म्हणजे दीपावलीतील भाऊबीज पूजनाचा दिवस.

या दिवशी बहिणीच्या घरी भाऊ गोडधोड भोजन करतो आणि सायंकाळी चंद्राची कोर दिसल्यानंतर बहीण प्रथम चंद्रकोरीस व नंतर भावाला ओवाळते. भाऊ मग ओवाळणीच्या ताटात ओवाळणी देऊन बहिणीचा सत्कार करतो.




'दिनमान' हे पत्र मुद्रक श्री. प्रदिप शंकरराव पडवळे, यांनी प्रकाशक व मालक श्री. समीर आयुब मुजावर यांचे करिता मुरारी मुद्रणालय, २१०० / क, १५२ / १७, महाडिक कॉलनी कोल्हापूर (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून ८६७, ई वॉर्ड, डॉ. डी. वाय. पाटील मेडिकल कॉलेजच्यामागे, कसबा बावडा, कोल्हापूर-४१६ ००६ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. (या साप्ताहिकात प्रसिद्ध झालेल्या मजकूराशी संपादक सहमत असतीलच असे नाही) संपादक- समीर आयुब मुजावर.